दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार दि.१९ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


## राजुरीतून अल्पवयीन मुलीला पळविले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : राहाता तालुक्यातील राजुरी गावातून एका अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेण्याचा प्रकार घडला.घरात एक अल्पवयीन मुलगी घटनेच्यादिवशी सकाळी घरी एकटी होती. तिची आई जनावरांना चारा आणण्यासाठी गेली होती.त्यानंतर आजी बँकेत गेली होती.सकाळी ११ वाजता जेव्हा आई चारा घेवून घरी आली, तेव्हा मुलगी घरी दिसली नाहीत. त्यामुळे तिचा आसपास शोध घेतला मात्र ती कोठेही आढळून आली नाही. त्यामुळे कोणीतरी तिला फूस लावून, कशाचे तरी हेतूने आमिष दाखवून पळवून नेल्याची तक्रार लोणी पोलिसात देण्यात आली.याबाबत लोणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

# मुळा कारखान्यात माजी मंत्री शंकरराव गडाख गटाचे वर्चस्व; १८ जागा बिनविरोध

## सहकार क्षेत्रावर गडाख यांची मजबूत पकड पुन्हा एकदा अधोरेखित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : मुळा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळ निवडणुकीत माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या गटाने पुन्हा एकदा आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे.गुरुवार (दि.१८) रोजी उमेदवारी अर्ज माघारी नंतर गडाख गटाच्या १८ जागा बिनविरोध निवडून आल्या असून, आता केवळ करजगाव गटातील दोन जागा आणि महिला प्रतिनिधीची एक जागा यासाठीच निवडणूक होणार आहे. १८ जागांवर बिनविरोध निवड झाल्यामुळे नेवासा तालुक्यातील सहकार क्षेत्रावर माजी मंत्री शंकरराव गडाख यांची मजबूत पकड पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे निवडणूक जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियावर गडाख विरोधी गटाकडून सर्व जागांवर लढत दिली जाणार असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात विरोधकांना सर्व जागांसाठी उमेदवार उभे करता आले नाहीत. परिणामी २१ पैकी १८ जागांवर बिनविरोध निवड झाल्याने विरोधी पॅनलवर केवळ तीन जागांसाठी निवडणूक लढविण्याची नामुष्की ओढवली आहे.



बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांमध्ये सोनई गटातून वसंत चिमा कुसळकर, छाया भास्कर भुसारी व दिनकर अंबादास घावटे यांचा समावेश आहे.

घोडेगाव गटातून लक्ष्मण तुळशीराम पांढरे, एकनाथ मारुती जगताप व दत्तात्रय भानुदास बऱ्हाटे, तर खरवंडी गटातून बापूसाहेब शंकर शेटे, भाऊसाहेब निवृत्ती मोटे व सोपान विठ्ठल विरकर हे बिनविरोध निवडून आले आहेत. नेवासा गटातून बाळासाहेब पुंजाजी भणगे व त्रिंबक काशिनाथ सुकाळकर, तर प्रवरासंगम गटातून बाळासाहेब दादा पाटील व पांडुरंग श्रीरंग निपुंगे यांची निवड झाली आहे. सहकारी संस्था मतदारसंघातून शंकरराव यशवंतराव गडाख,अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातून शंकर पंढरीनाथ कदम, इतर मागासवर्गीय मतदारसंघातून भाऊसाहेब हरिभाऊ भालके आणि विमुक्त जाती-भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्गातून बाळासाहेब भाऊलाल परदेशी हे बिनविरोध संचालक झाले आहेत. दरम्यान, करजगाव गटात गडाख गटाचे ज्ञानेश्वर रामराव दरंदले व चंद्रकांत भानुदास टेमक यांच्या विरोधात किरण जाधव, नारायण डौले तसेच अपक्ष उमेदवार गोरक्षनाथ जाधव रिंगणात आहेत. महिला प्रतिनिधी मतदारसंघात गडाख गटाच्या कमल चांगदेव दहिफळे व विमल नारायण सोनवणे यांच्याविरोधात मीरा दिवटे यांनी उमेदवारी कायम ठेवली आहे.

## विनयभंग प्रकरणातील आरोपीच्या घरावर बुलडोझर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहाता शहरात अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणामुळे संतापाची लाट उसळली असताना पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी कठोर कारवाईची भूमिका घेतलेल्या भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी दिलेला शब्द अखेर पूर्ण झाला आहे. प्रशासनाने संबंधित आरोपीच्या अनधिकृत बांधकामावर बुलडोझर चालवत कारवाई केली. घटना घडल्यानंतर डॉ. सुजय विखे पाटील यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेत त्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच महिलांच्या सन्मानाशी खेळ करणाऱ्यांविरोधात कोणतीही दया दाखवली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला होता. त्यानंतर पोलीस, महसूल आणि नगरपालिकेच्या प्रशासनाने संयुक्त कारवाई करत आरोपीच्या घरावर बुलडोझर चालवला. या कारवाईमुळे राहाता शहरासह संपूर्ण तालुक्यात कायद्याचा धाक निर्माण झाला असून महिलांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासन गंभीर



असल्याचा संदेश गेला आहे. गुन्हेगार कोणताही असो, त्याला कायद्यापुढे झुकावेच लागेल, ही भूमिका या कारवाईतून अधोरेखित झाली आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांनी याप्रसंगी प्रतिक्रिया देताना सांगितले की, पीडितेला न्याय मिळवून देणे आणि समाजात सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही आपली जबाबदारी आहे. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कोणतीही माफी नाही. कायद्याच्या चौकटीत राहून अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई व्हायलाच हवी. दरम्यान, या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून पीडित कुटुंबीयांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

## नारळ फोडण्याचा दगड मारून तरुणाचे डोके फोडले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : इथं मोटारसायकल का लावली, तुम्ही मंदिरात जायचे नाही, असे म्हणत शिवीगाळ करून मंदिरासमोर नारळ फोडण्याचा दगड मारून मुकुंद रघुनाथ पोकळे या तरुणाचे डोके फोडले. या घटनेत तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्या डोक्यातून मोठा रक्तस्राव झाल्याने त्याला उपचारार्थ अहिल्यानगरच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आरोपी दारूच्या नशेत तर असल्याने त्याने आणखी एकालाही मारहाण केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून भेटीचे वातावरण पसरले आहे.याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, दि. १५ जून रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी शिवाजी मोरे व मुकुंद रघुनाथ पोकळे हे दोघे मित्र मोटारसायकलवरून जामखेड येथून देवदैठण येथे देवदर्शनासाठी गेले होते.

तेथून दर्शन करून दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास बटेवाडी शिवारातील खर्डा रोडवरील मारुती मंदिर येथे दर्शनासाठी थांबले. त्यांनी मोटारसायकल मंदिरासमोर लावली व दर्शनासाठी मंदिरात जात असताना तेथे आरोपी बाळू उर्फ दिपक मनोहर खरात,( रा. बटेवाडी, ता. जामखेड) त्याठिकाणी उभे होते. दारूच्या नशेत असल्याने तुम्ही मोटारसायकल इथे का लावली? तुम्ही मंदिरात जायचे नाही, असे म्हणत मोटारसायकलची चावी काढून घेतली व मोटारसायकल खाली पाडली. त्यावेळी मोटारसायकलवर बसलेला मुकुंद पोकळे खाली पडला. फिर्यादी त्याला उचलत असताना आरोपीने मंदिराजवळ असलेला नारळ फोडण्याचा दगड मुकुंद पोकळे यांच्या डोक्यात मारला.

त्यामुळे ते गंभीर जखमी होऊन त्यांच्या डोक्यातून रक्तस्राव सुरू झाला. त्यानंतर फिर्यादी शिवाजी मोरे हे मुकुंद पोकळे यांना उचलण्यासाठी गेले असता आरोपीने तोच दगड फिर्यादीच्या डोक्यात, उजव्या खांद्यावर व पायावरही मारहाण केली. त्यामुळे त्यांनाही दुखापत होऊन डोक्यातून रक्त येऊ लागले. यानंतर फिर्यादीने स्वतःचा शर्ट काढून मुकुंद पोकळे यांच्या डोक्यावर बांधला व मोटारसायकल चालु करून त्यांना घेऊन तेथून निघाले. त्यावेळी आरोपीने, माझे नाव बाळू आहे. तुम्ही जर पोलीस स्टेशनला गेले तर तुमचे काही खरे नाही, अशी धमकी दिली. या झटापटीदरम्यान मुकुंद पोकळे यांचा मोबाईल हरवला आहे. त्यानंतर तेथे जमलेल्या लोकांकडून सदर व्यक्तीचे नाव बाळू उर्फ दिपक मनोहर खरात असल्याचे समजले. जखमी मुकुंद पोकळे व फिर्यादी शिवाजी मोरे हे मोटारसायकलवरून पवार हॉस्पिटल, जामखेड येथे आले. तेथील प्राथमिक उपचारानंतर मुकुंद पोकळे यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून ते बेशुद्ध अवस्थेत असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी शिवाजी मोरे यांच्या फिर्यादीवरून बाळू उर्फ दिपक मनोहर खरात, रा. बटेवाडी, ता. जामखेड, याच्याविरुद्ध जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संपत कन्हेरे करीत आहेत.

# श्रीरामपुरात गावठी पिस्तूल व धारदार शस्त्रांसह चौघे जेरबंद

### दोन वेगवेगळ्या कारवायांत दोन गावठी पिस्तुले, जिवंत काडतुसे व दोन लोखंडी कत्ती जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहरात बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात अपर पोलिस अधीक्षक कार्यालय व श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन यांनी संयुक्तपणे धडक कारवाई करत दोन वेगवेगळ्या प्रकरणांत चौघा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत दोन देशी बनावटीची गावठी पिस्तुले, दोन जिवंत काडतुसे तसेच दोन धारदार लोखंडी कत्ती जप्त करण्यात आल्या आहेत. अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार १६ जून रोजी जर्मन हॉस्पिटलच्या मागे पाण्याच्या पाटाजवळ दोन संशयित इसम गावठी कट्टा व जिवंत काडतुसे घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली.



त्यानुसार श्रीरामपूर शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी संशयित नाझीम अन्वर पठाण (वय २५, रा. वॉर्ड क्र. २, श्रीरामपूर) व मोहमद जाफर खुदाबक्ष पटेल (वय १८, रा. कडीताल वेस, श्रीरामपूर) यांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान नाझीम पठाण याच्याकडून एक देशी बनावटीचे गावठी पिस्तूल, तर मोहमद पटेल याच्याकडून दोन जिवंत काडतुसे, धारदार चॉपर व मोबाईल जप्त करण्यात आला.

चौकशीत दोघांनी ही शस्त्रे शाहरुख पटेल (रा. संजयनगर, श्रीरामपूर - फरार) याच्याकडून घेतल्याची माहिती दिली. याप्रकरणी भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

याच दिवशी दुसऱ्या कारवाईत वॉर्ड क्रमांक २ परिसरातील टकी खानावळीजवळ दोन इसम मोटारसायकलवर धारदार लोखंडी कत्ती घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून जाफर करीम शेख (वय ३६, रा. बजरंग चौक, श्रीरामपूर) व शाहरुख निसार पठाण (वय ३३, रा. वॉर्ड क्र. २, श्रीरामपूर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातील हिरो स्प्लेंडर मोटारसायकलची तपासणी केली असता प्रत्येकी एक अशा दोन धारदार लोखंडी कत्ती आढळून आल्या. या शस्त्रांबाबत समाधानकारक माहिती देता न आल्याने पोलिसांनी दोघांविरुद्ध भारतीय हत्यार कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विशाल खरे तसेच पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने केली.

## नेवाश्यात विनापरवाना बेकायदा वाळू वाहतूक, दोन ढंपरवर कारवाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील नेवासा हद्दीतील सुरेगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर जैनपुर कमानीजवळ दोन अवैधरित्या वाळु वाहतुक करणारे विना परवानाचे डंपर मिळून आले.पोलिस पथकाने पकडण्यात आलेल्या दोन डंपरमध्ये एकूण ७,२०,००० किमंतीचा मुद्देमाल जप्त केला.

डंपर चालक किरण बाळासाहेब दरोडे (रा.मारुती नगर,नेवासा खुर्द ) असे ताब्यात डंपर चालकांचे नाव आहेत. अनेक दिवसापासून या भागात अवैधरित्या मोठ्या वाळूची वाहतुक केली जात होती.

सदरची कारवाई (दि.१७ ) जून रोजी पहाटेच्या सुमारास करण्यात आली.पोलीस निरीक्षक प्रताप दराडे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विकास पाटील,पो.हे.कॉ.अजय साठे,चा.पो.हे.कॉ. संदिप बर्डे, पो.कॉ. अतुल शेळके, पो.कॉ.श्रीनाथ गवळी, पो. कॉ. नारायण डमाळे आदी पथकाने कारवाई केली.या प्रकरणी पो.कॉ.अतुल शेळके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नेवासा पो.स्टे गु.र.नं.५१०/२०२६ भारतीय.न्याय. संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# पाथरे खुर्द येथे घरफोडी

## सोन्याचे दागिने व दीड लाखांची रोकड लंपास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील पाथरे खुर्द येथे अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी घरात घुसून दोन तोळे सोन्याचे दागिने व दीड लाख रुपये रोख रक्कम असा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर शिवाजी जाधव (वय ३३, रा. पाथरे खुर्द, ता. राहुरी) हे १३ जून रोजी रात्री नेहमीप्रमाणे जेवण करून घरातील बेडरूममध्ये झोपले होते. १४ जून रोजी पहाटे सुमारे ५ वाजता जाग आल्यानंतर त्यांना हॉलचा दरवाजा उघडा दिसला. घरातील सामानाची उचकापाचक झाल्याचे लक्षात आल्यानंतर चोरीचा प्रकार उघड झाला.

अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटातील ड्रॉवरमधून दोन तोळे सोन्याचे दागिने चोरले. तसेच घरातील दोन लोखंडी पेट्या घेऊन घराच्या पाठीमागील शेतात नेल्या. तेथे पेट्या फोडून त्यामधील सुमारे दीड लाख रुपये रोख रक्कम घेऊन चोरटे पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व आरोपींचा शोध सुरू केला. याप्रकरणी ज्ञानेश्वर जाधव यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ६९३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (३) व ३०५ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.











